

भिंतींवरले नाच
कथा शमीम पदमसी रेखाटने उमा कृष्णस्वामी

# भिंतींवरले नाच



कथा **शमीम पदमसी**
रेखाटने **उमा कृष्णस्वामी**
अनुवाद **सुनीति जैन**

ज्योत्स्ना प्रकाशन

शिर्वीला वाटलं, 'नुसता हात हलवला आणि सारं अंगण स्वच्छ झालं तर किती छान होईल...

आणि आपोआप तांदूळ साफ होऊन त्याचं पीठ झालं आणि ताज्या शेणानं भिंती सारवल्या गेल्या तर....'





शिर्वी ही सह्याद्री पर्वताच्या कुशीतल्या एका खेड्यातली मुलगी. सुगीच्या सणाच्या आदल्या दिवशीची गोष्ट. रात्र झाली होती आणि मोठा पिवळाधमक चंद्र हलकेच उगवत होता. तिचे आई-वडील आणि दोघी बहिणी सणाची खरेदी करायला बाजारात गेले होते.

शिर्वी त्यांच्या बरोबर गेली नव्हती. सगळे बाहेर गेल्यावर एकटीनेच घरातील सर्व कामं उरकून तिला त्यांना चकित करायचं होतं.

त्यांना जाऊन आता बराच वेळ झाला होता. त्यांची परत यायची वेळ झाली होती. पण शिर्वीची कामं काही संपत नव्हती. आणि म्हणूनच शिर्वी पुटपुटत होती, 'मला वाटतं हे सगळं आपोआप...'





शिर्वी दमून जरा बसली.

''कुक! कुक! कुक!'' एका पक्ष्यानं सहज आवाज केला.
अंजिराच्या झाडावरून एक वटवाघूळ दचकून उडालं.
आकाशातून एक तेजस्वी उल्का खाली पडली.

शिर्वीला नदीजवळ अचानक काहीतरी दिसलं.
जणू चंद्रावरून कसलेतरी चंदेरी तुकडे उडत उडत
खाली येत होते. शिर्वी धावतच नदीजवळ गेली.
ते तुकडे म्हणजे चंदेरी प्राणी होते. थोडेसे माणसांसारखेच
दिसणारे. चंद्रकिरणांवरून एका पाठोपाठ एक घसरत
ते खाली उतरत होते.



खाली उतरलेल्या त्या चंदेरी प्राण्यांची
अचानक पळापळ सुरू झाली.
काठ्यांसारखे आपले हात उंचावून ते
मदतीसाठी हाका मारू लागले.

ती आणखी पुढे गेली तेव्हा तिला दिसलं,
त्यापैकी एक जण पाण्यात पडला होता
आणि प्रवाहात वाहून जात होता.





शिर्वीनं पटकन झाडाची एक लांब आणि बारीक फांदी तोडली. पाण्यात गटांगळ्या खाणाऱ्या त्या प्राण्याजवळ ती फांदी नेत शिर्वी म्हणाली, ''अरे छोट्या, पकड पाहू ही फांदी!''

त्या पिटुकल्यानं चटकन ती फांदी पकडली. शिर्वीनं हळूच त्याला काठावर आणलं.

''धन्यवाद,'' तो छोटा प्राणी म्हणाला.

''अरे,  मी यात विशेष काहीच केलेलं नाही!'' शिर्वी म्हणाली. मग तिनं विचारलं, ''तुम्ही कोण आहात? आणि आला आहात कुठून?''







''अर्थातच चंद्रावरून,'' त्यातला एक प्राणी पुढे येत म्हणाला, ''आम्ही चंद्रावरचे रहिवासी आहोत. झाडांवर चढण्यासाठी, फुलांचा वास घेण्यासाठी आणि पक्ष्यांची गाणी ऐकण्यासाठी आम्ही कधी कधी पृथ्वीवर येत असतो.''

''पण आम्हाला पोहता येत नाही,'' दुसरा एक प्राणी म्हणाला, ''चंद्रावर पाणी नाही ना, म्हणून!''

''आता तुझ्यासाठी आम्हाला काहीतरी करायला हवं.''

पण शिर्वी म्हणाली,''तुम्ही तर एवढे छोटे आहात, तुम्ही काय करू शकणार?''


तिने ज्या प्राण्याला वाचवलं होतं तो म्हणाला, ''तू मनातल्या मनात काहीतरी म्हणत होतीस ना मघाशी...''





शिवींनं काही सांगायच्या आत ते चंदेरी प्राणी भराभर कामाला लागले. त्यांनी तांदूळ साफ करून त्याचं पीठ केलं, अंगण झाडून साफ केलं, भिंती सारवल्या... काही क्षणांतच सारी कामं पार पडली.

''आम्ही प्रकाशाच्या वेगानं काम करतो,'' एक चंदेरी प्राणी म्हणाला, ''चला, झालं काम. आता नाचू या!''
त्यांच्यातला एक जण तारका वाद्यावर मधुर सूर आळवू लागला. इतर सारे जण त्याच्या भोवती जमले, टाळ्या वाजवू लागले, ताल धरू लागले.





सुरुवातीला त्यांनी हलके हलके फेर धरला आणि मग त्यांची गती वाढत गेली, खूप खूप वाढत गेली.

''अरे, काय चाललंय तिकडे?'' अंधारातून कुणीतरी विचारलं.

नाचणारे प्राणी घाबरले. त्यांनी नुकत्याच सारवलेल्या भिंतीवर उड्या मारल्या, एका पाठोपाठ एक... तारपावादक मध्यभागी आणि बाकीचे सारे त्याच्या भोवती गोलाकार.



काय चाललंय हे पाहण्यासाठी
बरीच माणसं जमा झाली.
इतक्यात शिर्वीचे आई-वडीलही परतले.
त्यांनी जेव्हा भिंतीवरची चित्रं पाहिली
तेव्हा त्यांना वाटलं ती शिर्वीनेच काढली आहेत.

''फारच सुंदर आहेत ही, शिर्वी!''
तिची आई म्हणाली.









''खरंच, फार सुंदर आहेत!'' इतर लोकही म्हणाले.
या पूर्वी अशी सुंदर चित्रं कोणीही कधी काढली नव्हती.

त्या दिवसानंतर वारली लोक त्यांच्या घरांच्या भिंती
नाचणाऱ्या, गाणाऱ्या, गायींना चरायला नेणाऱ्या,
नांगरणी करणाऱ्या, प्रार्थना करणाऱ्या...
अशा विविध पांढऱ्या आकृत्यांनी सजवू लागले.





पण भिंतीवरच्या नाचाचे रहस्य
फक्त शिर्वीलाच ठाऊक होते.





This book is dedicated to my daughters – Yasmin, Shanaz, Mahajabeen and Nusha; my grandchildren – Mehdi, Sophia Jena and Ziya; and my grandnieces and nephews –SophiaMaya, Aaniya, Inaya, Ishaan and Zain. I hope it will help them know India better, as well as all the people who make it great. – Shamim

**वारली लोकांची भिंतीवरील चित्रे त्यांच्या साधेपणासाठी व जिवंतपणासाठी जगप्रसिद्ध आहेत. पण ही कला निर्माण तरी कशी झाली?**

**शमीम पदमसी यांनी सांगितलेली, या पारंपरिक कलेची ही काल्पनिक कथा!**

शमीम पदमसी भारतभर व जगभर खूप फिरल्या आहेत. त्यांना कला, हस्तकला, खाद्यपदार्थ, वास्तुशिल्प, लेखन, वाचन यांची आवड आहे. मुलांच्या शिक्षणातही त्यांना विशेष रस आहे. विविध वनस्पती आणि प्राणी, उत्सव, भारतातील जनजीवन यांबद्दल त्यांच्याकडे असलेली माहिती त्यांना इतरांना सांगायलाही आवडते. मुलांसाठी लिहिलेलं हे त्याचं पहिलंच पुस्तक.

कलेच्या विद्यार्थिनी व शिक्षिका असलेल्या उमा कृष्णस्वामी चेन्नई येथे राहतात. लोककला व हस्तकला यात त्यांना विशेष रस आहे.

अनुवादक सुनीति जैन निवृत्त शासकीय अधिकारी असून सध्या लेखनाचे व भाषांतराचे काम करतात.

9 788179 252536

₹ ५०/-

ज्योत्स्ना प्रकाशन